THANE CITY
Safe Thane Secure Thane

# ❖ प्रेस नोट ❖

## शांतीनगर पोलीस ठाणे,भिवंडी
## परिमंडळ—२, भिवंडी
## ठाणे शहर

दिनांक २३/०१/२०२५

**‘‘ऑल आउट ऑपरेशन दरम्यान रियलमी कंपनीचे एकुण २० मोबाईल सह संशयीत आरोपीस शांतीनगर पोलीसांकडून ताब्यात घेवून रूपये ४,१९,९८०/—किंमतीची मालमत्ता हस्तगत’’**

---

दिनांक २२/०१/२०२५ रोजी शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी हद्दीत राबविण्यात आलेल्या ऑल आउट ऑपरेशन दरम्यान शांतीनगर पोलीस ठाण्याचे तपास पथकाने सारीका हॉटेलचे समोर, हनुमान मंदिर जवळ, सुभाषनगर, भिवंडी, येथे रात्री ११:४५वाजता संशयीत हालचाल असलेला इसम—**अमीत चुन्नीलाल चौरसीया, वय २४ वर्षे,** रा.घर नंबर २२१, सकाराम चाळ, गणेश मंदिरचे जवळ, रावजी नगर, भिवंडी, जिल्हा—ठाणे दोन बॉक्ससह ताब्यात घेवून त्याची झडती घेतली असता त्याचेकडे मिळुन आलेल्या दोन बॉक्समध्ये **एकुण ४,१९,९८०/—रूपये एकुण किंमतीचे रियलमी कंपनीचा realme 12 मॉडेल असलेले एकुण २० नवीन मोबाईल** मिळुन आले आहेत.

वर नमुद इसम याचेकडे मिळुन आलेले मोबाईलचे मालक कोण आहे? सदरचे मोबाईल कोठुन आणले? कोठे घेवुन जात आहेस? सदर मोबाईलचे बिला बाबत विचारपुस केली असता त्याने काहीएक समाधानकारक माहिती दिलेली नाही. तसेच त्याचे ताब्यात मिळुन आलेल्या मोबाईलची बिले व कागदपत्र दाखवण्यास असमर्थता दर्शविल्याने सदरची मालमत्ता (२० मोबाईल) त्याने कोठुनतरी लबाडीने अथवा कपटाने स्वत:चे फायदयाकरीता चोरून आणले असावे असा दाट सशय आल्याने त्यास वर नमुद मालासह जागीच पंचनामा करून ताब्यात घेण्यात आले असुन पुढील त्याबाबत पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे व तपास पथक करीत आहे.

नमुदची कामगीरी मा.पोलीस उपायुक्त सो. परिमंडळ—२, भिवंडी डॉ. मोहन दहीकर, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त सो. पुर्व विभाग श्री सचिन सांगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक सो. (गुन्हे) अतुल अडूलकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) विनोद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि सुरेश चोपडे, पोहवा/१८६५रिजवान सैयद, पोशि/४७१७ दिपक सानप, पोशि/८२४२ प्रशांत बर्वे, पोशि/४०९८ भुषण पाटील सर्व नेमणुक—शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी यांनी केली आहे.